लोकमत

# विद्यापीठात सायबर क्लबची स्थापना

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृती आणि विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संगणकशास्त्र संकुलामध्ये "सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा" या उपक्रमांतर्गत सायबर क्लबची स्थापना करण्यात आली आहे. हा उपक्रम क्विक हील फाऊंडेशनसोबत झालेल्या सामंजस्य कराराच्या अंतर्गत राबविण्यात येणार आहे.

सायबर क्लबच्या पदाधिकाऱ्यांची निवड नुकतीच करण्यात आली असून विपाशना खराटे यांची अध्यक्ष प्रणाली मसाळ यांची सचिव सौंदर्या कांबळे यांची ॲक्टिव्हिटी डायरेक्टर तर सचिन धामणेकर यांची मीडिया डायरेक्टर म्हणून निवड करण्यात आली आहे. संगणकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजीवकुमार मेंते हे क्लबचे समन्वयक म्हणून कार्य पाहणार आहेत.

क्लबच्या पदाधिकाऱ्यांना पुणे येथील क्विक हीलच्या कार्यालयात विशेष प्रशिक्षण देण्यात आले. हे प्रशिक्षण गायत्री केसकर व दीपू सिंग यांनी दिले. यावेळी क्विक हील फाऊंडेशनच्या संचालिका अनुपमा काटकर तसेच अजय शिर्के यांनीही विद्यार्थी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. सायबर सुरक्षेचे महत्त्व, डिजिटल सुरक्षितता, सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण आणि जनजागृतीची माहिती दिली.